
# आनंद स्वामी - श्रीपाद भिकाजी ताटके



आनंदस्वामी श्री. भि. ताटके



पत्नी सौ. शुभदा

दीड दिवसांचे गणपती घरी गेल्यावर श्री आनंदस्वामींना भेटण्याचे ठरले.

दुपारचे अडीच वाजले होते. भीत भीत आम्ही सौ. वसुधा ताटकेंच्या (आनंदस्वामींची मोठी सून) ब्लॉकची बेल वाजवली. चटकन् दरवाजा उघडला गेला. 'या', म्हणून प्रसन्न हसून सौ. वसुधाताईंनी आमचं स्वागत केलं. 'पाणी घ्या' म्हणून पाण्याचे लोटीभांडं समोर आणून ठेवलं. 'आलेच हं, म्हणून त्या आतल्या खोलीत गेल्या. तेवढ्यांत पांढरा लेंगा, पांढरा हाफ बुशशर्ट घातलेले आनंदस्वामी बाहेर आले. आम्ही उठून उभ्या राहिलो.

येण्याचे प्रयोजन मुलाखतीचे सांगितल्यावर स्वत:बद्दल माहिती सांगायला लागले. माझा जन्म ११ जुलै १९३३ चा मुंबई येथे झाला. पुणे, मुंबईत माझं प्राथमिक व पुढे एस.एस.सी पर्यंतच शिक्षण झालं. साहित्यप्राज्ञ झाल्यावर कॉलेजमध्ये नाव घातलं. पण घरच्या आर्थिक परिस्थितींचा आढावा घेतला आणि कॉलेजकडे पाठ फिरवली. बालपण खूप कष्टात गेलं. मात्र खाण्यापिण्याचे कधीही हाल झाले नाहीत. शिक्षण घेत असतांना आलेपाक, स्टेशनरी, रंगरांगोळी, सौंदर्यप्रसाधने, पातळे यांची घरोघर जाऊन विक्री केली आहे. इथे एक गोष्ट आठवते सांगण्यासारखी आम्ही पुण्यात सोमवार पेठेत, गोसावी वाड्यांत रहायला होतो. मी त्यावेळी ५-६ वर्षाचा होतो. आमच्या घरी शेजारी-पाजारी, पै-पाहुणा, नातेवाईक यांचं नेहमी येणंजाणं असे. शेजारच्या पंडितकाकू एकदा माझ्याकडे आल्या आणि मला म्हणाल्या, सदू, वासंतीचं लग्न जमत नाही, कधी होईल?

काकू काळजी, सोडा. येत्या नोव्हेंबर महिन्यांत दुसऱ्या आठवड्यात तिचं लग्न होईल आणि दयाघन प्रभूच्या कृपेने तसंच झालं. एकदा वाड्यातल्या विंचूरकर काकू माझ्याकडे आल्या आणि मला म्हणाल्या, 'सदू आमच्या मनोहरला कधी नोकरी लागेल?, पुढल्या महिन्यात!' त्याचं पत्र तयार आहे. आठ दिवसांत हातांत पडेल आणि प्रभुकृपेने तसंच झालं. हे मी कसं सांगत होतो ते मला सांगता येणार नाही! प्रश्न समोर आला की, त्याचं उत्तर आपोआप सुचत असे. देणे ईश्वराचे!

दरम्यान बऱ्याच नोकऱ्या झाल्या,

नंतर २३ वर्षांपेक्षा जास्त स्वत:ची 'अभिश पब्लिसिटी सर्व्हिस' ही जाहिरात कंपनी चालवली, वाढवली आणि 'श्री' ची आज्ञा होताच बंद केली. गाणगापूरच्या प.पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या कृपेने माझा जन्म झाला म्हणून माझं नाव 'श्रीपाद' ठेवण्यात आलं. वडीलांची आई माझी आजी ती बनूताई, श्रीस्वामी समर्थांची निष्ठावान उपासक, आई - ती. सौ. आनंदीबाई, शंकर आणि देवी उपासक, वडील- ती. श्री. भिकाजीपंत, दत्तावतार प.पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे ६५ वर्षांहून अधिक काळ कृपांकित. या साऱ्यांनी आपली अध्यात्मिक 'इस्टेट' मला दिली.

त्याशिवाय प. पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज अक्कलकोट निवासी श्री.स्वामी समर्थ प.पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंब्ये) स्वामीमहाराज प्रतिदिन मला सर्वार्थाने सांभाळतात. नित्य सूचना देतात. १९८५ साली अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थांनी तोंडी आदेश देऊन मला सांगितले, 'आजपासून तू आनंदस्वामी झालास!'

माझे आजवर २१ छोटे-मोठे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्यात संतचरित्र, गुरुचरित्राचे अनेक अध्याय, श्रीअन्नपूर्णा उपासना, श्रीलक्ष्मीव्रत, रोगनिवारणार्थ अध्यात्मिक, उपचार, सुखी, आनंदमय जीवन कसे जगाल? आदि ग्रंथांचा समावेश आहे.

माणगांव (सिंधुदुर्ग) हे प.पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंब्ये) स्वामी महाराजांचे जन्मस्थान आहे. तेथे डोंगरावर सिद्धमहापुरुषाची एक गुहा आहे. श्रीस्वामीमहाराज दररोज साधनेसाठी तेथे दिवसभर उपासनामग्न असत. ते थोडे दुर्गम स्थान आहे. आबालवृद्धांना तेथे नीट जाता येता यावे म्हणून श्री आज्ञेने तेथे सुमारे २७५ पायऱ्यांचे बांधकाम 'श्री'नी करवून घेतले. तसं गेली ३० वर्षे आम्ही सर्व साधक कार्यरत आहोत. मुख्य श्रीदत्त मंदिराभोवतालचे लादीकाम, झाडांचे विविध पार, पायऱ्या, ५ संडास-बाथरुम आदींचे बांधकाम, भक्तनिवास निर्मितीला अन्नदान सेवेला द्रव्य सहाय्य. श्रीनांदोडकरमहाराज स्मृतीमंदिराचे बांधकाम विविध विहीरींची स्वच्छता आदी कामे झाली आणि क्षेत्र विकासाची इतर कामे 'श्री' करवून घेत आहेत.

पान क्र. १३ वर


।। रेशीम गांठी ।। ®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन
वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे

## ''चांदण्याचे थवे'' – सौ. वैशाली हळबे

''चारोळ्या'' आणि ''चांदण्याचे थवे'' अशी दोन पुस्तके की, ज्यामध्ये ६१ कविता आणि ''चारोळ्या'' काव्य प्रकार वाचनांत आला. सौ. हळबे यांच्या कवितामधून नेमके सांगायचे झाल्यास सोपी व सरळ भाषा परंतु परिणामकारी आहे. त्यांच्या कविता उत्तम आहेतच शिवाय त्याच्याबद्दल त्यांचे विचार त्यांच्या स्वभावातील साधेपणा, त्यांच्या लिखाणातून जाणवतो त्या म्हणतात

''मी एक विनम्र वाचक आणि शब्दांची पूजक!
भावनांचा आदर आणि माणुसकीची कदर करावी!
अशी भावना! माणसा–माणसामधील नाती हळूवार
जपावीत, प्रेमाच्या देवघेवींनी जतन करावीत!''

''चांदण्यांचे थवे'' या काव्यसंग्रहातील दोन कविता खास ''संपर्क'' च्या वाचकांसाठी

**– संपादक**

### ''अस्तित्व''

काळोख गर्द वेणा, दिवसा विरुन गेल्या
सूर्यास जाग आली, दव पाकळीत ओल्या!
नभ चांदण्यात जेव्हां, उजळून मौन झाले
ते श्वास चंद्रम्याचे, अवघ्या दिशेत भरले!
स्वप्नस्थ सागराची, आवर्तमग्न वाळू
पृथ्वीस वाटले की, केसांत आज माळू!
शिवणीत पर्वतांच्या, पाषाणमग्न तुकडे
गर्भस्थ भावनांना, कुरवाळतात झाडे!
पाना फुलांत गंध, हसतो जरा–जरासा
सृष्टीस पावसाचा, मिळतो पुरा दिलासा!
हे विश्व प्रकाशमान, मानव्य–दीप तेज,
नाविन्य रोज येथे, आयुष्य हो सतेज।
अस्तित्व जाणिवांचे, उमले चराचरांत
चैतन्य गीत झरते, साऱ्याच जीवनांत.



### ''संदेश''

माझ्या हातातला दिवा
तू जन्मभर जतन कर
प्रकाशाने उजळून टाक
आयुष्याचे अंधार घर।
आठवणींच्या फुलामधला
गंध जपून ठेव।
निर्वाणाच्या वाटेवरती
सद्भावाचे फुटेल पेव।
आकाशातले पक्षी जरी
झोपी गेले घरट्यातून।
झाडे त्यांना संभाळतात
आपला जीव लावून
तुझ्या पंखाची भरारी
जावो क्षितीजा पल्याड।
अशाश्वतावरती शाश्वताची
रांगोळी तू काढ।
आता खरंच संपत आला
रात्रीचाही तिसरा प्रहर।
पहाटे–पहाटे झाडावरच्या
फुलांनाही येईल बहर!

**सौ. वैशाली हळबे, रत्नागिरी**
**मो. ९९७५५५१३८९**

## गावाकडची वाच्यता

**पान क्र. ७ वरून**

सर्वांची संमती घेणे क्रमप्राप्त असते.

अशावेळी बाहेर शहरात असेल तर त्या हिस्सेदार किंवा परदेशात आपल्या नवऱ्याबरोबर असलेल्या बहिणींची संमती मिळवणे जिकीरीचे होते त्यामुळे तेथील अर्धशिक्षित शेतकरी या सर्व जंजाळाला कंटाळून शासकीय योजना किंवा बँकेचे कर्ज घेण्यापेक्षा सावकारी पाशात अडकतो. ९० टक्के बहिणी भावाच्या मिळकतीतील हिस्सा मिळवण्यासाठी इच्छुक नसतात. परंतु अशांकडून तरी संमती पत्र घेऊन ७/१२ वरील नांव कमी करणे शक्य आहे. परंतु तेही घडतांना दिसत नाही.

शिक्षणाचीसंधी मिळालेला भाऊ नोकरी धंद्यावर बाहेर गांवी शहरात जातो व गांवी राहणाऱ्या शेतकरी भावाच्या उत्पन्नात हिस्सा मागतो. परंतु आपण केलेल्या मिळकतीमध्ये गांवच्या भावाला हक्क नाही असे मानून त्याच्यावर बळजबरीने किंवा कायदेशीर उपायाने उत्पन्नाचा हिस्सा हिसकावून घेतो त्यावेळी तेथील शेतकरी, भावाला ना सरकार ना आप्तेष्ट कोणीही संरक्षण देऊ शकत नाही. नोकरी करणाऱ्या भावाच्या गळ्यात ५० ग्रॅम गोफ तर बायकोच्या गळ्यात जाडजूड मंगळसूत्र असते पण शेतकरी भावाच्या बायकोच्या गळ्यात चांदीची डबली असलेली काळ्या मण्याची माळ अशा विषमतेमुळे आजचा तरुण गावांत राहून घरदार सांभाळणे व शेतीवाडी करणे पसंत करीत नाही. अशी आजची दैना झाली आहे. त्यामुळे गांवे ओस पडत असून, शहरात महापूर ओसंडून वहात आहे.

**– प्रभाकर चिं. प्रभुदेसाई**

## आनंद स्वामी – श्रीपाद भिकाजी ताटके

**पान क्र. १२ वरून**

जवळ–जवळ १४ महिने धोपेश्वराच्या जंगलात वास्तव्य केलं. अखेर.... अखेर मंदिर मूर्ति तयार झाली आणि 'श्रीं' नी आज्ञा केली. मंदिरावर एक मजला चढवा आणि तेथे श्रीयंत्राची स्थापना करा! 'श्रीं'च्या कृपेमुळे तेही काम संपन्न झालं. अवघ्या ८ महिन्यांत मूर्तिसह, श्रीदत्तमंदिर त्याच्या बाजूची १०० फूट बाय १३ फूट भिंत, श्रीयंत्र संपन्न झालं. एक वर्ष हे मंदिर सर्वार्थाने सांभाळून नंतर गांवकऱ्यांच्या ताब्यात दिलं. त्याला २४ लाख रुपये खर्च आला!

एक व्यक्ती आपल्या सहकार्याच्या मदतीने आणि श्रींचे आशिर्वाद पाठीशी असल्याने खूप कामे करतो, त्याचप्रमाणे सिद्धी प्राप्त झाल्याशिवाय कोणतीही गोष्ट सांगू शकत नाही. परंतु ईश्वराची असीम भक्ती केल्यामुळे, ही सिद्धी प्राप्त झाली. स्वामी समर्थांनी 'आनंदस्वामी' झाल्याची कृपा ज्यांचे हाती लागली आहे हे आनंदस्वामी यांचेशी वार्तालाप करून, मी माधुरी शेंबेकर, सौ.माणिक दीक्षित व सौ. मंगला खांडेकर अशा तिघीजणी स्वामींचा प्रसाद ग्रहण करून आनंदाने परतलो. आनंद स्वामींची भेट घेऊन जर आनंद प्राप्ती, समाधान मिळवावयाचे असेल तर खालील पत्त्यावर किंवा फोनवर संपर्क करावा.

**माधुरी शेंबेकर – मुलुंड, मो. ९८६९०४९३५२**

श्रीपाद (सदानंद) भिकाजी ताटके
तथा
आनंदस्वामी
२२/१४ डी, रानडे हायस्कूल जवळ,
झावबावाडी, मुंबई – ४००००२
फोन ०२२–२२०१९६६१